॥ श्री धन्वंतरये नम:॥

# राणी जानकीबाईसाहेब वैद्यकीय संस्थेचे भाईसाहेब सावंत आयुर्वेद महाविद्यालय, सावंतवाडी

(महाराष्ट्र शासन अनुदानित-केंद्रीय भारतीय चिकित्सा परिषद मान्यता प्राप्त महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक संलग्न)

## १) पूर्व पीठिका

भाईसाहेब सावंत आयुर्वेद महाविद्यालय, सावंतवाडी ही महाराष्ट्र शासनाने सिंधुदुर्ग जिल्ह्याला दिलेली अमूल्य देणगी आहे. कोकणात ही ज्ञानगंगा आणण्यासाठी कोकणचे सुपुत्र माजी आरोग्य व वैद्यकीय शिक्षण खात्याचे मंत्री नामदार स्वर्गीय भाईसाहेब सावंत यांचे भगीरथ प्रयत्न कारणीभूत ठरले.

आयुर्वेद महाविद्यालय सावंतवाडीच्या निर्मितीमागे मुंबई निवासी सावंतवाडीतील एक कर्तव्यदक्ष नागरिक व आयुर्वेदोपासक वैद्य जयवंत बाळकृष्ण नाईक यांची मूळ संकल्पना व प्रेरणा जशी आहे तशीच किंबहुना त्यापेक्षाही जास्त या भागातील नागरिकांचे विशेषत: दानशूर नागरिक स्वर्गीय शेठ श्री. वसंतराव केसरकर, श्री. माधवराव मसुरकर यांचे अनमोल सहाय्य व श्री. अनंतराव पोकळे यांचे अथक परिश्रम कारणीभूत आहेत.

या सगळ्यांच्या पाठिंब्यावर १९८४-८५ मध्ये सावंतवाडी येथे राणी जानकीबाईसाहेब वैद्यकीय संस्था या संस्थेच्या विद्यमाने आयुर्वेद महाविद्यालयाची झालेली निर्मिती म्हणजे संस्थेने वैद्यकीय शिक्षण क्षेत्रात टाकलेले अत्यंत महत्वाचे व तितकेच धाडसाचे पाऊल होय. संस्थेची षष्ठ्यब्दीपूर्ती होत असतानाच आयुर्वेद महाविद्यालयाची निर्मिती हा शुभ शकुनच म्हणावा लागेल. आर्थिकदृष्या मागासलेल्या कोकणातल्या विद्यार्थ्यांना वैद्यकीय शिक्षणाची सोय अजुनपर्यंत या भागात उपलब्ध नव्हती. ती सोय करून संस्थेने या भागातील एक निकड पूर्ण केलेली आहे.

भारतीय संस्कृतीची उच्च परंपरा लाभलेल्या आयुर्वेद शास्त्राच्या अध्ययनास औषधी वनस्पतींनी समृद्ध असलेल्या कोकणची पार्श्वभूमी अत्यंत पोषक ठरेल. आयुर्वेदिय चिकित्सेच्या दृष्टीने चांगल्या गुणकारी औषधांची निर्मिती महाविद्यालयातून बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी एक वरदानच ठरेल. सगळ्या जगाचे लक्ष आज आयुर्वेदाकडे लागले असतानाच कोकणासारख्या सरस्वतीचे वरदान लाभलेल्या भागातील बुद्धिमान पण गरीब विद्यार्थ्यांना वैद्यकीय विद्याशाखेत हे महत्वाचे दालन उघडून संस्थेने समाजशिक्षणाच्या दृष्टीने तिच्या मूळ उद्दिष्टांशी निगडीत सेवा कार्यच बजावले आहे.

१९८४-८५ साली शहरातील उभाबाजार येथील शेठ गोविंदराव केसरकर इमारतीत सुरू झालेले महाविद्यालय १९८५-८६ साली संस्थेच्या सूतिकागृहाच्या परिसरात स्वत:च्या इमारतीत आले आहे. महाविद्यालयाचा वाढता व्याप या इमारतीत मावणे शक्य नाही व त्या दृष्टीने प्रयोगशाळा, शवविच्छेदन गृह, ग्रंथालय, वाचनालय, सभागृह इत्यादिंनी सुसज्ज इमारत बांधणे आवश्यक होते. दोन वर्षांच्या अल्पावधीतच संस्थेचे या दृष्टीनेही वचनपूर्ती केली आहे.

अत्याधुनिक सोयी सवलतींनी युक्त अशा आयुर्वेदिक वैद्यकीय महाविद्यालय, रुग्णालयाच्या निर्मितीबरोबरच पूर्णतया आयुर्वेदिक पद्धतीने विचार करू शकणाऱ्या सुजाण तसेच सुसंस्कृत वैद्यांची निर्मिती करण्यासाठी संस्था वचनबद्ध तसेच कटिबद्ध आहे. अशा रितीने राष्ट्रीय आरोग्य योजना तसेच कुटुंब कल्याण कार्यक्रमांची अंमलबजावणी जबाबदारीने पार पडू शकेल, अशी वैद्यकीय शिक्षणांच्या बाबतीत सर्व अंगांनी परिपूर्ण अशा प्रशिक्षित चिकित्सकांची पिढी निर्माण करण्यासाठी व ती परंपरा सातत्याने टिकवून ठेवण्यासाठी संस्था प्रयत्नशील व दक्ष राहील. या महाविद्यालयाने तेवीस वर्षे यशस्वी वाटचाल

करून चौवीसाव्या वर्षात पदार्पण केले आहे. या तेवीस वर्षात सातत्याने ९०% च्या आसपास निकाल देऊन आपली गुणवत्ता सिद्ध केली आहे. परीक्षे सातत्याने या महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी विद्यापीठात प्रथम व द्वितीय क्रमांकाने उत्तीर्ण होऊन गुणवत्ता यादीत ठेवून यश मिळवले आहे.

या महाविद्यालयाचे काम पाहून माडखोल, ता. सावंतवाडी येथे या संस्थेस महाराष्ट्र शासनाने साठ एकर जमीन दिलेली आहे. सदर ठिकाण वनौषधी लागवड, संशोधन केंद्र, औषधनिर्माण केंद्र व कर्मचारी वसाहत निर्माण केली जाणार आहे. वनौषधी लागवड प्रकल्प कार्यान्वित असून मोठी विही फार्म हाऊस, गांडूळ खत प्रकल्प पूर्ण झाले आहेत.